श्री.



# स्त्रीगीतकुसुममाला.

रचयिता ( पूर्वाश्रमी )

लक्ष्मण रामचंद्र गोळवलकर.

प्रकाशक.

अनंत नरहर महाजन.

रावपुरा–महाजनाची पोळ–बडोदें.

१९३०.

किंमत ०–२–०.

REFBK-0004237

# जाहिरात

## वरें झालें, एकदाची काळजी दूर झाली-

कोणाची ?

ज्यांना स्वदेशी माल वापरावा अशी इच्छा आहे पण खात्रीचा स्वदेशी माल कुठें मिळतो त माहित नाहीं.

## मग असें निराश कां होता ?

तुम्हांला खात्रीपूर्वक स्वदेशी माल मिळण्याचें ठिकाण पाहिजे एवढेंच ना ? हा घ्या पत्ता-

**एम्. गोडबोले आणि मंडळी**

रावपुरा. महाजनाची पोळ-बडोदें.

आम्हांकडे मिळणाऱ्या स्वदेशी मालाचें हस्तपत्रक लवकरच प्रसिद्ध करण्याचा विचार आहे,

REFBK-0004237

# प्रस्तावना

ह्या पुस्तकांतील बरींच गीतें पूर्वाश्रमी श्री. रा. लक्ष्मण रामचंद्र गोळवलकर ह्यांनीं प्रसंगानुसार रचलेलीं असून तीं कन्याशाळा व फीमेल–ट्रेनिंगकॉलेजांत झालेल्या मोठ्या समारंभांत ह्मटलीं गेलीं आहेत. सदरहु कवीनें चतुर्थाश्रम घेतल्यावर त्यानीं आह्मांस सोंपलेल्या कवितांचे संग्रहांतून स्त्रियांस ह्मणण्यालायक अशीं २३ गीतें आह्मीं निवडलीं आहेत. सदरहु विविध प्रकारचीं गीतें स्त्रियांना खरोखर मनोरंजक व बोधप्रद होतील आणि तसेंच कन्याशाळेंतील संगीत-शिक्षकांनाही तीं उपयुक्त होतील, असें जाणून तीं 'स्त्री गीतकुसुममाला' ह्या नांवानें छापविलीं आहेत.

ह्या कवीनें रचलेलीं विविधपद्यकुसुममाला व संगीतश्रुतिसिद्धांत (पद्यात्मक) अशीं दोन पुस्तकें थोड्याच दिवसांत छापण्याचें योजिलें आहे.

मिति कार्तिक वद्य १० शनिवार
शके १८९२ बडोदें.

प्रकाशक,
अ. न. महाजन.

# अनुक्रमणिका.


| गीताचें नांव. | नंबर. | गीताचें नांव. | नंबर. |
|---|---|---|---|
| गणराज स्तवन. | १ | स्त्रियांचें रिकामपण. | १२ |
| संतभेट. | २ | पार्थप्रेम. | १३ |
| कन्याशिक्षा. | ३ | ढालगज सून. | १४ |
| सीता पश्चाताप. | ४ | छळणारी सासू. | १५ |
| फुलबाग. | ५ | दुर्योधन. | १६ |
| दागिन्याचा सोस. | ६ | व्रताचरण. | १७ |
| मंदोदरीचा बोध. | ७ | नागपंचमी. | १८ |
| नेमधर्म. | ८ | नागपंचमी. | १९ |
| चंद्रमा. | ९ | चंद्रसेना. | २० |
| भयभीत द्रौपदी. | १० | जगदंबा. | २१ |
| द्रौपदीचा धावा. | ११ | सती अनुसुया. | २२ |

अंबिका प्रार्थना. २३



**ल. रा. गोळवलकरकृत**

**(१) श्रीगजाननपद्यरत्नमाला-भाविकास फुकट.**

**प. केशवानंदस्वामीकृत**

**(२) विजयपुरी येथील आदर्शरूप ब्राह्मणसभा ०-२-०**

**सदरहु पुस्तकें आमचेकडे मिळतील.-प्रकाशक.**

श्री.

# स्त्रीगीतकुसुममाला.

## मंगलाचरण

॥ वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ॥
॥ देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥

### गीत नं. १ गणराजस्तवन. चाल–गावो आनंदे सह्णु० (गर्भा).

॥ प्रेमें वंदूं श्रीगणराज सुंदर गौरिकुमार ॥
॥ होऊं धन्य बघुनि तो आज नयनीं जगदाधार ॥धृ०॥
॥ चाल ॥ रत्नजडित शिरिं मुकुट विराजे, कर्णी कुंडल शोभति फार ॥
॥ शुभ्रांशूची प्रभा ललाटीं, वदन दिसे सुकुमार, सुंदर गौरिकुमार॥ प्रे०।१
॥दोहरा॥ निर्गुण निष्क्रिय मूळचा असुनीहि निराकार ॥
॥ दासासाठीं जाहला गजमुख विविधाकार ॥
॥चाल॥ फरशांकुश धृत हस्तांवरती रम्य दिसे शेलाहि अपार ॥
॥ सरळ सोंड धवलांगीं साजे सन्मणिमौक्तिकहार सुंदर गौ०॥प्रे०॥२॥
॥दोहरा॥ हा जगदात्मा पाहुनी दासाचा निर्धार ॥
॥ भक्तिबळें वश होउनी सुखवी अपरंपार ॥
॥चाल॥ पीतपितांबर कटीं मेखला, चरणिं तोरड्या किंकिणिदार ॥
॥ तृप्ति न वाटे रूप मनोहर बघतां वारंवार, सुंदर गौ०॥प्रे०॥३॥

४२३६

**गीत नं. २ संतभेट. चाल–बघुनि त्या भयंकर भूता०**

॥ भूतळीं साधु–संतातें प्रत्यक्ष देव मानावें ॥
॥ तत्पुण्य–चरित्र सु–भावें एकाग्रमनें परिसावें ॥
॥ ब्रह्मनाळ नामें होती पुरि दक्षिण देशा ख्याती ॥
॥ अष्टांग–योगि साधू जे आनंदमूर्ति तैं वसती ॥
॥ सपन्न वृक्ष फलभारें सुंदर झरयुत भूमी ती ॥
॥ कोकील सारिका राघू आश्रमीं मधुर रव करिती ॥
॥ सुजनांच्या सहवासानें कारुण्य वसे त्या ठायां ॥
॥ श्रीसमर्थस्वामी तेथें पातले सहज भेटाया ॥
॥ आनंदमूर्तिला कळतां पूजादि ध्यान सांडोनी ॥
॥ लगबगिनें द्वारीं आले भेटले उभय प्रेमानीं ॥
॥ आगमनें व्यत्यय आला तुमच्याहि नित्य ध्यानातें ॥
॥ तिष्ठलों मि असतों येथें श्रीसमर्थ वदले त्यांतें ॥
॥ मुनि बोले ज्यास्तव सारे यम–नियम–ध्यान साधावें ॥
॥ ते द्वारिं उभे सहसिद्धी नयन कां मिटुनि मग ध्यावें ॥
॥ साश्चर्य ऐकुनी वाटे संतोष रामदासातें ॥
॥ सौमित्रा हो अशि सेवा वर्णितां संत–लीलेतें ॥१॥

**गीत नं. ३ कन्याशिक्षा. चाल–अंधारो रजनी. (गरभा)**

॥ कन्या–शिक्षा–सुमनाचा हा कंठीं धारण्यानें हार
सुखें करुं येतसे संसार ॥

॥ अवगुण टाकुनि देतां, घेतां सद्गुण–सार सखये फार
सुखें करुं येतसे संसार ॥ धृ० ॥

॥ प्रात:काळि उठावें विभुला ध्यावें, जाणुनी दातार
आपुल्या सुखासि जो आधार ॥

॥ वेणी–फणि करुनी नित स्वच्छ रहावें आवरुनि संभार
होय मन प्रसन्न अपरंपार ॥

॥ **दोहरा** ॥ सत्यानें रवि ऊगवे, सत्यें मेघ पडे ॥
॥ सत्य वदावें सर्वदा, सत्य जना आवडे ॥कन्या०॥१॥

॥ नूतन नित्य शिकावें रंगवली, कशिदे किं शिवणें धार–
णा धरुनी मनीं अनिवार ॥

॥ लेखन वाचन गायन पाक–क्रियेंत हुषार होतां फार,
म्हणती काय सुग्रण नार ! ॥

॥ **दोहरा** ॥ चोरि चहाडी करूं नये, चटोरता न बरी ॥
॥ हत्याहि तशी करूंनये, पापेंही जबरीं ॥कन्या०॥२॥

॥ मात पित्याची पतिची कीं वडिलांची सदैव आज्ञा धार–
णीं उपजे मनीं सुविचार ॥

॥ रहावें टापटिपीनें, परि तें साधें मोकळें मनि, पार
त्यजोनि कुलक्षणें हि भिकार ॥

॥ **दोहरा** ॥ सुलक्षणें जे युक्त त्या लोक तुकविती मान ॥
सत्कीर्ति जगिं होतसे गाती तद्यश–गान ॥कन्या०॥३॥

**गीत नं. ४ सीतापश्चात्ताप. रा. असावरी. काय वधीनमी.**

॥ फारचि फसलें त्या विपिनीं मी बोलुनि भाउजिला ॥ घृ० ॥
॥ काय मिं भुललें कंचुकिसाठीं ! । मायावी त्या हरिणापाठीं ।
॥ पाठविला म्यां तो जगजेठी !
॥ आधिच कथिलें सत्य न मृग हा, सोडी नादाला ॥ फार०॥१॥
॥ धांव धांव सौमित्रा आतां ॥
॥ अवचित पति–रव वाटे चित्ता ॥
॥ कृत्रिम हें, भाउजिंनं कथितां ॥
॥ कटुवचनें मीं फार दुखविलें, लावुनि दोषाला ॥ फार०॥२॥
॥ उग्र निशाचर रावण मेला ॥
॥ गोसावी रुप घेउनि आला ॥
॥ स्कंधिं बळें मज घेउनी गेला ! ॥
॥काय करूं मी, एकटि अबला, काळ कसा फिरला ॥फार०॥३॥

**गीत नं. ५ (फेराचें) बागेचें वर्णन. राग बिलहरी.**

॥ फुलबाग–शोभा पाहूंगे सुमति, रमोनियां सये फिरोनियां ॥घृ०॥
॥ जाईजुई ह्या प्रफुल्ल दिसती । शोभे सेवंतिका किती ॥ फुल०॥१॥
॥ जातीजातीचे गुलाब तरि किति । घंघंघं कसे सुवासती॥ फु०॥२॥
॥ सुरेख हा मोगरा वकुल ती । वाटे कीं जणुं सुहासती ॥फुल०॥३॥
॥ समीर शीतल सुगंध वाहति । नामी निर्झर निनादती ॥फुल०॥४॥
॥ तऱ्हेतऱ्हेचे मधूप पक्षी । सुस्वर–शद्बें सुखावती ॥फुल०॥५॥
॥ प्रसन्नतेचा झरा सकलजो । विभु तो ध्याऊं यथामती ॥फुल०॥६॥

## गीत नं. ६ दागिन्याचा सोस. राग सिंध–काफी

॥ अति सोस अलंकरणीं न बरा, जगिं सद्गुण भूषण हेंचि खरें ॥
॥ गुण देतिल थोरवि नारि-नरा, नच रौप्य सुवर्ण किं मोतिं हिरे ।धृ०।

॥ नग शोभति मात्र वरी तनुला ॥
॥ जन पाहुनि देतिल मान भला ॥
॥ परि मानति अंतरिं मूढ जरीनसतां गुण-भूषण कंठिं खरें ॥गुण०॥१

॥ तरि द्वेष धरा नच अर्थधरां ॥
॥ गुण जोडुनियां जगिं लक्ष्मिवरा ॥
॥ जरि लक्ष्मि-सरस्वति एकवटे, जनिं काय उणें मग त्यांसि बरें ॥
गुण० ॥२॥

## गीत नं. ७ राग–सारंग रावणास मंदोदरीचा बोध.

॥ मंदोदरि बोध करी रावणासि विनवुनियां ॥
॥ स्वकुल-नाश करिता कां पर-जाया गांजुनियां ॥धृ०॥
॥ कां न कळे सुविचारा जानकि आदीमाया ॥
॥ राम परात्पर ब्रह्मचि शिवहि जपे जाणुनियां ॥१॥
॥ शरणागत रघुनाथा व्हा, न याल संसृति या ॥
॥ बंधु बिभीषण झाला सुखि तत्पद सेवुनियां ॥२॥
॥ कपिसैन्या मेळवुनी मारुति ये घेउनियां ॥
॥ संगें सौमित्रि राम हरतिल यश दंडुनियां ॥३॥

**गीत नं. ८ उपवासादिक नेमधर्म. चाल–बघुनित्या०**

॥ जगिं नेमधर्म जन करिती उपवासादिक जे कांई ॥
॥ तन्मूलहेतुज्ञानानें मनिं शिवे न संशय. बाई ॥धृ०॥

॥ श्रुति मातेची जी आज्ञा तो धर्मचि प्रथम उपायीं ॥
॥ मानावा स्वहितासाठीं विश्वसोनि माते ठायीं ॥१॥

॥ ऋषिवेंर धर्म प्रकटविले कालानुसार मग पाही ॥
॥ स्वानुरूप स्वीकारावें अनलसैंग ते लवलाही ॥२॥

॥ साह्यार्थ दान सांगितलें आरोग्य उपासें येई ॥
॥ विधि-निषेध धर्मा कथिले विनटाया मन प्रभुपायीं ॥३॥

॥ मन पंचविषयिं रमतें जें मर्यादेवीण सदाही ॥
॥ होतसें सरळ धर्मानें सामर्थ्य सकल मग येई ॥४॥

**गीत नं. ९ चंद्रमा. चाल–ऊग्यो सखि सृष्टीनो. (गर्भा).**

॥ तेजपुंज चंद्रमा निशापती । पाहि पाहि वरि आला गे द्यौ–पथीं ॥
॥ तारका तशाच चमकती किती । बघुनि चित्तवृत्ति आनंदावती.॥धृ०॥

॥ **दोहरा** ॥ वाटे अमृत ओतलें देवें ह्या बिंबांत ॥
॥ सुधांशु म्हणुनी बोलती यातें ह्या लोकांत ॥

॥ **चाल** ॥ धरणी धवल–चंद्रिका–चीर जणुं परिधान केलि दिसे ॥
॥ रजनी मौनपणीं कशि शांत प्रेमळ छान शोभतसे ॥

क्र०१०५ ७०२८

। ग्रहणिय नसे ? किं हा गुण सांग ।
। प्रीतिविण दिसे न तो सये चांग ।
। धरणी ध०........................ ।। तेजपुंज० ।।

।। **दोहरा** ।। रत्नजडित चांदवा लटके गगनीं दूर ।।
।। शोभे सुंदर चंद्रमा जैसा कोहीनूर ।।

।। **चाल** ।। ह्या रम्य चांदव्याखालीं । शशिवैभव पाहुनि धाली ।
। स्मित जणूं सृष्टि करी गालीं । किति सौख्य गमे या कालीं ।

।। **दोहरा** ।। गमतो चंद्र चकोरका सुखकारक निष्पाप ।
। हिमांशु म्हणती ह्या जगी, परि चोरा दे ताप।।तेजपुंज०।।

## गीत नं० १० भयभीत द्रौपदी. चाल—सवतचि भासे मला.

।। अभय न वाटे मना । वैरी—सभा बघतांना ।।धृ०।।
।। पति मानतिना मानापमाना । कैसी दया उपजेना ।।अभय।। १।।
।। करुणा माझी कोणासि ये ना । भीष्मादिही घेति मौना ।।अभय।। २।।
।। काय करूं मी कांहीं सुचेना । शांती गमे हृदयां ना ।।अभय।। ३।।
।। संकट माझें आणोनि ध्याना । ये माधवा रिपुदमना ।।अभय।। ४।।

## गीत नं० ११ द्रौपदीचा धावा. राग कालिंगडा त्रिताल.

।। आलें शरण मि त्रिभुवननाथा । मजला कोणि दिसेना त्राता ।।धृ०।।
।। दुष्ट दुशासन छल करि किति हा । व्यसनीं बुडतें आतां ।।आलें।। १।।

॥ दीन–दयाळा प्रभु कनवाळा । तवचरणीं मम माथा ॥आलें॥२॥
॥ कोण तुझ्याविण आश्रय मजला । अंत न पाहि अनंता ॥आलें॥३॥
॥ बाहे तुज ही द्रौपदि भगिनी । मानुनियां तुज भ्राता ॥आले॥४॥
॥ ये गा ये गा ये मधुसुदना । झालें निर्भय चित्तां ॥आलें॥५॥
॥ लज्जा रक्षिलि त्वां भगिनीची । रिपु मम वसना हरितां ॥आलें॥६॥

## गीत नं. १२ स्त्रियांचें रिकामपण. चाल–बघुनि त्या भयंकर.

॥ घरिं रिकामपणच्यावेळीं कुलस्त्रियांनि काय करावें ? ॥
॥ आळस कीं गप्पा त्यजुनी, ज्ञानार्जन कांहिं करावें ॥ धृ० ॥
॥ छापील सुवाच्याक्षर तें वाचाया प्रथम शिकावें ॥
॥ हळु हळु मग लिहितां येते, शिकण्यास न कंटाळावें ॥
॥ भारतादि रामायण कीं, सुचरित्रें साध्वि स्त्रियांचीं ॥
॥ पुस्तकें विविध मिळवोनी वाचावीं सुखकर साचीं ॥
॥ साधनें परिस्थिति असतां ज्ञानार्जनिं उल्हासावें ॥
॥ परभाषा, संस्कृतभाषा गणितादि सकलहि शिकावें ॥ घरिं०॥१॥
॥ संगीत वाद्य रांगोळ्या कीं कलाकुसरीचीं कामें
॥ फुरसुतींत नित्य शिकावीं, न निजावें उगिच रिकामें ॥
॥ परकरादि चोळ्या, टोप्या आंगडीं विजारि मुलांच्या ॥
॥ शिवतां न नीचपण येई, जें निंदेतचि लोकांच्या ॥
॥ उपयुक्त स्त्री--बाळांची जी रोगचिकित्सा साधी ॥
॥ शिकल्यावर खर्चाविण त्या मिटतील घरांतिल व्याधी ॥ घरिं०॥२॥

॥ वडिलांची अवमर्यादा न करोनी गाणिं म्हणावीं ॥
॥ जरतार–सूत–लोकरिचीं विणकामें सुबक विणावीं ॥
॥ कुशलता मिळवुनी पाकीं सुपदार्थ मधेंच करावा ।।
॥ आद्यापरि खर्च करोनी सकलही हिशेब लिहावा ॥
॥ समजोनि अशाश्वत सारें तरतूद उद्याचि करावी ॥
॥ गृहिं आहे नाहीं बघुनी, सांगून जिनस आणावी ॥ धरि०॥३॥
॥ स्वग्राम जाति देशाची समजोनि परिस्थिति घ्यावी ॥
॥ कर्तव्य काय महिलांचें, सुरहस्यें तीं जाणावीं ॥
॥ आवरुनि वस्तु ठेवाव्या स्वच्छता असावी नामी ॥
॥ गृहकार्य करित संसारीं, रंगावें भगवन्नामीं ॥
॥ पाहुनी, ऐकुनी किंवा वाचून ज्ञान मनुजा ये ॥
॥ ज्ञानानें मति पाजळतें, शुभमतिनें शांति मना ये ॥ धरि०॥४॥

## गीत नं. १३ पार्थ-प्रेम. चाल-घेउन ये पंखा.

॥ केला कृष्ण ऋणी पार्थानें विश्वाचा धनी ॥ केला० ॥धृ०॥
॥ भीष्म यदा समरीं मूर्छित करि पार्थातें ।
॥ मोडुनियां शपथ खरी, शस्त्र धरी झणीं ॥ के० ॥१॥
॥ संगरिं नाटोपे कर्ण यदा किरिटीला ।
॥ रथचक्रा क्षिति गिळितां मारविला रणीं ॥ के० ॥२॥
॥ रथाश्व पार्थाचे होतां श्रांत स्वयें त्या ।
॥ सोडुनियां पाजितसे पाणी आंगणीं ॥ केला० ॥३॥

॥ भक्ती—भावाचा देव भुकेला दासा ।

॥ संकटिं तो रक्षितसे, वैगुण्या न गणी ॥ केला ॥४॥

## गीत नं. १४ ढालगजसून. चाल—उद्धवा शांतवन करजा.

॥ ढालगज सुनेचि रहाणी । वाईटच लाजिरवाणी ॥ धृ० ॥

॥ कामाचा तिज कंटाळा, सासुनेंच सर्वकरावें ।

। कीं सासू नसतां पतिनें हरएका विषयिं पहावें ।

। घरिं नोकरचाकर असतां त्यावरिच सर्व सोंपावें ।

। **चाल** । उन्ह आल्यावर नित उठणें । हळुहळू वेणिफणि करणें ।

। मग रेंगाळत आंग धुणें । करुं नये धुणें कीं पाणी ॥ढाल०॥१॥

। घरिं कामें पडलीं असतां गावांत भटकत फिरावें ।

। या घरुनि त्या घरिं बसावें सासरच्यांसीं निंदावें ।

। मग सांजवात जरि झाली तरि घरास नच परतावें ।

॥ **चाल** ॥ ही कोण ! मावशी माझी । ही म्हणे मामिची आजी ।

। कुणि म्हणतां ' रहाग आजी ' । ही राहि तिथेंच शहाणी ॥ढाल० २

। सासूतें भोजन—समयीं मज भूक नाहिं सांगावें ।

। काकड्या, मुळे, बोरें कीं दारावर चिवडे घ्यावे ।

। काफि—चहा करुन अवेळीं कडवळीं मजादिक खावें ।

॥**चाल**॥ कधि घरांतुनी चोरावें कीं परक्या घरिं जेवावें ।

। रागेंच उपाशि निजावें स्वस्थपणें वर जावोनी ॥ढाल०॥३॥

। कुणि जरा कांहिं तिज पुशिलें तरि सरळ न उत्तर द्यावें ।
। जैं काम एक शद्बाचें तैं दहा शद्ब बोलावें ।
। सासूस तुझें माझेंही करण्यास न कांहिं पहावें ।
॥ चाल ॥ प्रेमाचा शब्द न पतिशीं घालुनी शुष्क वादासी ।
। करि कटकट ते प्रतिदिवशीं आणुनियां नयनां पाणी ॥ढाल०॥४॥

। कधि लिहिणें पुसणें नाहीं, कीं काम कला कुसरीचें ।
। कधि नाहीं शिवणें विणणें, कीं काम रंगवल्लीचें ।
। गाणेंही एक न येई, कीं रंजन होय मनाचें ।
॥ चाल ॥ परक्यासि सदा खिदळावें । आवडी धरुन बोलावें ।
। मर्यादेवीण हंसावें । अशि असते कां हो गृहिणी ॥ढाल०॥५॥

। कधि मंगल दिनिं सणवारीं ही असे सदा फुगलेली ।
। पाहुणे घरीं कधि असले त्या दिवशीं ही रुसलेली ।
। घरिं अडचण असल्यावेळीं दुखण्यानें ही निजलेली ।
॥ चाल ॥ मग कसलें घरचें काम । मुखिं न घे कधीं हरि—नाम ।
। खोटेंच कण्हे बेफाम । करि ढोंगें लाजिरवाणीं ॥ढाल०॥६॥

। नवीं नवीं पोलकीं लुगडीं, नेसोनि सदा मिरवावें ।
। पतिपाशीं शाल्ूसाठीं, कधि हट्ट धरुनि बैसावें ।
। रागेंच अबोला धरुनी, सर्वांवर उगिच रुसावें ।
॥चाल॥ कधि मूल रडत टाकावें । वेळेवर नच पाजावें ।
। आबाळ सदाहि करावें । वागुनियां मूर्खावाणी ॥ढाल० ॥७॥

। दागिने जुने मोडोनी, लाखेचे नग घडवावें ।
। न विचारुनि पतिला कांहीं, किति मोंतीं घ्यावें द्यावें ।
। खोटीच्या या व्यापारें, नुकसान करुनियां घ्यावें ।
॥चाल॥ घरच्यांशि तसें इतरांसी । बोलूच न दे कवणासी ।
। स्वहितार्थ अशा मूर्खेसी । सांगावें मग हो कोणी ॥ ढाल० ॥८॥

। ह्या तऱ्हा सकल बघतांना । एकत्र कुठें नच दिसती ।
। तरि कितिक नव्या ज्या चाली । फाजिल त्या कथिल्या नसती ।
। सासवा तशा वाइट ज्या । ऐकवीन त्यांच्या रीती ।
॥चाल॥ ही कहाणि द्वाड सुनेची । सकळिक्रा न लागू साची ।
। सत्कीर्ति असे जगिं ज्यांची । त्यांसि न दे दूषण कोणी ॥ढाल० ॥९॥

## गीत नं. १९ छळणारी सासू. चाल–उद्धवा शांतवन कर जा.

॥ सासवा कितिक त्या असती । निष्कारण सुनेस छळती ॥धृ०॥
॥ कटिं कळशी देउनि फुटकी, सारखें पाणि भरवीती ॥
॥ घरिं जळ भरलें असतांही, तरि उन्हांत तिज पाठविती ॥
॥ तिज दासीसम वागविती, कधि रिकामि बघवे ना ती ॥
॥चाल॥ झाडून घरांतिल सारीं । कामें लहान आणि भारीं ॥
॥ सांगतीच अष्टौ प्रहरीं । छळणूक तिची अशि करिती ॥सा० ॥१॥
॥ देउनी धुणें मोटभरीं, सांगति धू विहिरी वरती ॥
॥ नसतींच काढुनी कामें, गंजलीं भांडिं घासवितीं ॥
॥ सारवुनि दळवुनी घेती, निशिं स्वैपाका गुंतविती ॥

॥चाल॥ कांहिंकां तिला होईना । तिचि दया कुणा येईना ।
। भागलीस कोणि म्हणेना । किति विचित्र ही दैवगती !॥सा० ॥२॥

॥ ती वर्णानें बहु काळी, म्हणुनीच नावडे कवणा ॥
॥ ती गरिब आइबापाची, आवडे न सासरिं कवणा ॥!
॥ तिज अजुन मूल होईना, त्यामुळें गमेना कवणा ॥
॥चाल॥ दैवाधिन किति गोष्टींचा । नच उपाय मानव-मतिचा ॥
॥ याच्यांत काय वांक तिचा । मनिं असा विचार न करिती॥सा०॥३

॥ कधि लपुनि वाचितां कांहीं, लाखोलि शिव्याची देती ॥
॥ मास्तरिणबाइ कां ? म्हणती, पुस्तकें मिरविशी हातीं ॥
॥ तव आइबाप येउनि कां, येथिल या करतिल वाती ॥
॥चाल॥ किति बोलति टोंचुनि बोल । पाडिती क्षतें हृदिं खोल ॥
॥ मानुनियां कवडी मोल । करिती तत्जीवित माती ॥सास० ॥४॥

॥ शेजाऱ्या पाजाऱ्यासी बोलण्यास चोरी तिजला ॥
॥ मैत्रिणिचें सदनीं जाणें स्वप्नीं न विनोदचि कसला ॥
॥ सुख कसें तिला लाभावें ! आनंदचि तिजवर रुसला ॥
॥चाल॥ स्वातंत्र्य नसे मुळि तिजला । जीवात्मा तैं निर्बुजला ॥
मनिं म्हणे हाय ! हे मजला । माहेर न कां दाखविती ॥सा० ॥५॥

॥ गाऱ्हाणि सुनेचीं सारीं तत्पतिला सांगत बसती ॥
॥ राईचा डोंगर करुनी, पतिकर्णीं विष फुंकरती ॥
॥ पतिलागि विचार न अगदीं । न बघे तो न्याय व नीती ॥

॥**चाल**॥ थोड्याशा अपराधाला । मग डाग देति अंगाला ।
। सकलही मारिती तिजला । कोंडोनी तिज ठेवीती ॥सा० ॥६॥
॥ स्मित तिला पतिप्रति बघतां । तिचि सात कुळें उद्धरिती ॥
॥ कोणाशिं कामकाजांतीं । बोलतां शील दूषविती ॥
॥ पतिच्याहि तिला सेवेला । कितितरी अडथळे करिती ॥
॥**चाल**॥ या मत्सराग्निच्या ज्वाला । घालुनी भयंकर वाला ।
। आंचुनी स्नुषा चित्ताला । बालिकेस कोमेजवती ॥सा० ॥७॥
॥ घरिं दारिं सदा त्या कुमती स्वसुनेची निंदा करिती ॥
॥ खायास शिळें तिज देती कधिं उपासही घडवीती ॥
॥ जीं जीर्ण जाहलीं वसनें तीं नेसायाला देती ॥
॥ **चाल** ॥ तिज एक असे कां त्रास । यमपुरीचा शुद्ध निवास ।
। भोगतां गळालें मांस । मृत्यूंतचि शेवट करिती ॥ सा० ॥ ८ ॥
॥ हे जाच सकल बघतांना एकत्र कुठें नादळती ॥
॥ तरि कितिक सासुनणदांच्या सांगितल्या ऐशा गमती ॥
॥ इतकेंचि असें कारग कीं, सुधराव्या असल्या रीती ॥
॥**चाल**॥ काहणी दुष्ट सासूची । सकळिका न लागू साची ॥
॥ सत्कीर्ति असे जगिं ज्यांची । कवण त्यांसि वाइट ह्मणती । सा०॥९॥

**गीत नं. १६ दुर्योधन. चाल-नृपममता रामावरती.**

सखेवरीं

॥ कथि संजय धृतराष्ट्राला । दुर्योधन जाउनि लपला । ~~सखेखरी~~ ॥
॥ धृतराष्ट्र पुसे मग त्याला । परिणाम असा कां झाला । संगरीं ॥ध्रु॥

।। दुर्बुद्धि सोबती केले । कुळनाशा कारण झाले । खरोखरी ।।
।। भीमासी विष चारविलें । लाक्षागृह वनिं निर्मियलें । असुहरी ।।
।। धर्मासि द्यूत खेळविलें । कपटानें त्या हरविलें । झडकरी ।।
।। चाल ।। करुं दिले चार हे भले मना मानले । तुम्हींच हि त्याला ;
।। संस्कार पूर्व पोसविला । ह्यापरी ।। कथि ।।१।।
।। द्रौपदीस ओढुनि नेलें । भरसभेंत चिर फेडविलें ।। अरिकरीं ।।
।। तुम्हि मौन तिथें कां धरिलें ।। कोणिंहि कां नाहिं दटविलें ।।अवसरीं।।
।। वनवासा तुम्हि पाठविलें । दुष्टांनिं तिथेंही छळिलें । परोपरी ।।
।। चाल ।। तुम्हि वर्म दुखविलें शरम सोडुनी परमपुण्य धर्माला ।।
।। विसरतां किं कृतकर्माला । ह्यापरी ।। कथि० ।।२।।
।। भीष्मादिक सांगुनि थकले । कृष्णासहि अपमानीलें ।। त्वां घरीं ।।
।। कृतपातक उदया आलें । बुद्धीनें रण मागितलें ।। सत्वरीं ।।
।। समरांगणिं जिवलग खपले । सकलही बेत ते जिरले । अंतरीं ।।
।। चाल ।। आतां काय सर्व सदुपाय खुंटले जाइ शरण कृष्णाला ।
।। सुख होईल त्यांत तुम्हांला ।। अतां तरी ।। कथि० ।।३।।

## गीत नं. १७ व्रताचरण. चाल सदासंसारमां

।। व्रत–आचरण सदा स्त्रीने हितकारी थशे ।।
।। चित्तनो दुर्मल ते धीमे धीमे सहु खरशे ।।
।। स्वधर्म–सेवनथी संसृतीना दुख टळशे ।।
।। दयाघन ईश जोई भावनें कृपा करशे ।। टेक ।।

॥ दोहा ॥ मानवने सुख धर्मथी, धर्मे मळशे ज्ञान ।
॥ धर्म थकी शांति वळे धर्मे जयने मान ॥ व्रत ॥१॥

॥ दोहा ॥ स्नान दान उपवासमां जेजे छे आचार ॥
॥ शुद्धभावथी जे जन जोशे तेने मळशे सार ॥ व्रत ॥२॥

॥ दोहा ॥ तेम पुरातन नागपाचमनुं व्रत आजे निरधार ॥
॥ नागदेवना दर्शन करिए साहेलिओ आ वार ॥ व्रत ॥३॥

## गीत नं. १८ नागपंचमी–राग भैरवी ताल धुमाळी

॥ आज नागपंचमिच्या दिवशीं गावुं सख्यानों मिळुनीयां ॥
॥ नव–आभरणें विविध–भूषणें मंगलकारक लेवुनियां ॥धृ०॥

॥ भारतदेशांमाजि पुरातन कालापासुनि सकल स्त्रिया ॥
॥ नागोत्राचें पूजन करिती चित्तीं अभया चिंतुनियां ॥
॥ अनेक विभुती प्रभुच्या असती त्यांतचि हे वासुकिरायां ॥
॥ वास्तव सद्भावनें त्यातें वंदूंया कर जोडुनियां ॥
॥ विषबाधा नच व्हावी कवणा विनति करूं अशी अहिराया ॥
॥ सदा सुखी ठेवा सकलांना क्रोध आवरुनि करा दया ॥१॥

## गीत नं. १९ नागपंचमी राग–सिंधुरा. ताल खेमटा (गर्बा)

॥ चालो जइए आज नागपांचमनो सखिओ तेहेवार ।
फुलवाडी खीली अपार ॥ टेक ॥

मार्मिक ग्रंथ

॥ केवडाने चंदनना वासी नाग ते खरा ॥
॥ शीतअंग पवनाहारी शक्तिमान आकरा ॥
॥ हाथ जोडी नागदेवतानी कृपा याचिए अवार ।
अर्पिने सारा पुष्पहार ॥ १ ॥

॥ नागदेवतानी पुजा भावथी आचरीए ॥
॥ तेमनी जे तीव्रता ते प्रभुनीज मानिए ॥ हाथ जोडी ॥ २ ॥

॥ दूध पात्रमां भरी अहीपतीने पाइए ॥
॥ दूरथी उभा रहीने सह्नु तेने वंदिए ॥ हाथ जोडी ॥ ३ ॥

## गीत नं. २० चंद्रसेना.

॥ सजविला मि रंगमहाल पहा कितितरी ॥
॥ रामास चंद्रसेना बहु वर्णन करी ॥
॥ श्रीरामप्रतिज्ञा जाणुनि हृदयांतरीं ॥
॥ करि निवासास आग्रह ती अंत:पुरीं ॥ धृ० ॥

ग्रंथ संग्रहालय
क्र. क. 4236

॥ ह्या अनेक बैठकि खालीं–वरच्या जरी ॥
॥ किति सुरेख खुलती नरम गालिच्यावरी ॥
॥ अति बलिष्ठ मचकिं शेज पहा भरजरी ॥
॥ वर–खालि घातल्या स्वच्छ शुभ्र चादरी ॥
॥ लाविले भव्य आरसे बिलोरी वरी ॥
॥ चहुंफेर चांदवे, मोत्याच्या झालरी ॥ सज० ॥ १ ॥

॥ सिंचिलें गुलाबाचें पाणि सभोंवरीं ॥
॥ किति वास मधुर वाऱ्यानें येतो तरी ॥
॥ शशि नक्षत्रें जशि शोभति त्या अंबरीं ॥
॥ चमकती दीप तैसे सुंदर झुंबरीं ॥
॥ अत्तरें सुवासिक चंदन-उटि साजिरी ॥
॥ सुकुमार शरीरा लावुं कां मि द्वो करीं ॥ सज० ॥२॥
॥ ही नानापरिचीं सुमनें आणुनि बरीं ॥
॥ गुंफिले हार गजरे मिं तुरे किति तरी ॥
॥ ही रुचिकर खाद्यें सिद्ध करुनि मंदिरीं ॥
॥ सेवेंत ठेविलीं सुवर्ण तबकांतरीं ॥
॥ बहु उत्तेजित मधुपेयें घ्यावीं करीं ॥
॥ तांबूल ठेउनी विनवितसे सुंदरी ॥ सज० ॥३॥
॥ श्रीरामें पद ठेवितां मंचकावरी ॥
॥ कडकडाडला मंचक तो निमिषांतरीं ॥
॥ विरमली चंद्रसेना जाहलि घाबरी ॥
॥ दुर्दैव म्हणे मी काय अतां करुं तरी ! ॥
॥ अवतारिं न या तवमनिषा होइल पुरी ॥
॥ राघवें कथुनि तिज, वरिलें जन्मांतरीं ॥ सज० ॥ ४ ॥

**गीत न. २१ जगदंबा राग—मिश्र मांड. ताल खेमटा.**

॥ जगदंबा भवानि—गुण गातां फेर धरूं चला, फेर धरूं चला ॥

॥ धन्यधन्य दिवस आजि आनंदाचा नवरात्रींतला नवरात्रींतला ॥धृ०॥

॥ दोहा ॥ महिषासुर नांमें असुरें जिंकियलें इंद्रास ॥

॥ विधिहरिहर मग कोपतां, तेज उसळलें खास ॥

॥ अशाकाळीं धरिशि अवतारा तूं महाकालि मंगला महाका० ॥जग०॥

॥चाल॥ खड्ग-तोमरादि आयुधें करांत घेउनी ॥

॥ फार उग्र अशा मृगेंद्रावरीच बैसुनी ॥

॥ कंठि सर्प-हार, भालिं भव्य तिलक लेवुनी ॥

॥ घोर संग्राम करुनि त्या संगरीं महिषासुर मारिला, तो असुर मारिला ॥

॥ जग० ॥

॥दोहा॥ महिषासुर वनिं मारितां, झाला तत् कुलनाश ॥

॥ अतिशय सुख मग जाहलें सकलहि त्या अमरांस ॥ जग० ॥

## गीत नं. २२ सती अनुसुया.

॥ सांग अनुसुये सामर्थ्य सकल तुजला आलें कसें ? ॥

॥ ऋषि–पत्नी कुणि येऊन तिजला जिज्ञासेनें पुसे ॥धृ०॥

॥ म्हणे अनुसुया पतिला दैवत चिंति मि मानीतसे ॥

॥ आळस सोडुनि पतिसेवा मी शुद्धमनें करितसे ॥

॥ नित्य पतीपूर्वीं उठुनी गृह–कार्या लागत असे ॥

॥ स्नानापासुन सकल तयारी पतिचि मि ठेवीतसे ॥

॥ गोड अशा प्रेमळ शब्दांनीं नित्य पतिशिं वदतसे ॥

॥ पाहुन पतिची मर्जि, तसें मी अनुरुप वागत असे ॥

॥ वस्त्राभरणें तसे
॥ प्रसन्न कीं दुःखं
॥ पति प्रवासी दु
॥ स्वप्नींहीं मज
॥ व्रताचरण, तीर्थ
॥ वागत जा तूं अ

गीत नं. २३

॥ अंबिके मि
॥ बालिका तु
॥ मात-तात तूं
॥ देउनी तुं प्रेम

REFBK-0004237
REFBK-0004

दागिने कधीं मि मागत नसे ॥
पति असतां तशीच मी होतसे ॥
नणाइत कीं असतां नच नटतसे ॥
रपुरुषाचें चिंतन माहित नसे ॥
रुण, पूजन, सकलहि मज पति असे ॥
तें सकल सामर्थ्य न येई कसें ॥१॥

## अंबिका प्रार्थना. चाल–मूर्तिमंत भीति०

प्रार्थितसें मजवरी कृपा करी ॥
री मि अज्ञ, ज्ञानरूप तूं खरी ॥ अंबिके० ॥
च मला दोष मम क्षमा करी ॥
चरणिं, रक्षिगे परोपरी ॥ अंबिके० ॥१॥

ॐ तत्सत्

237
ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. 8236

॥ वस्त्राभरणें तसे दागिने कधीं मि मागत नसे ॥
॥ प्रसन्न कीं दुःखी पति असतां तशीच मी होतसे ॥
॥ पति प्रवासी दुखणाइत कीं असतां नच नटतसे ॥
॥ स्वप्नींहीं मज परपुरुषाचें चिंतन माहित नसे ॥
॥ व्रताचरण, तीर्थाटण, पूजन, सकलहि मज पति असे ॥
॥ वागत जा तूं असें सकल सामर्थ्य न येई कसें ॥१॥

**गीत नं. २३ अंबिका प्रार्थना. चाल-मूर्तिमंत भीति०**

॥ अंबिके मि प्रार्थितसें मजवरी कृपा करी ॥
॥ बालिका तुझी मि अज्ञ, ज्ञानरूप तूं खरी ॥ अंबिके० ॥
॥ मात-तात तूंचि मला दोष मम क्षमा करी ॥
॥ देउनी तुं प्रेम चरणिं, रक्षिगे परोपरी ॥ अंबिके० ॥१॥

**ॐ तत्सत्**

REFBK-0004237
REFBK-0004237
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. 4236